I V

आभार

कै. चिं.त्र्यं. खानोलकर यांचे समग्र साहित्य म्हणजे समीक्षकांना रसिकांना एक आवाहनच आहे. याची नम्र जाणीव ठेवूनच मी या प्रतिभावंताचे साहित्य माझ्या शोधप्रबंधासाठी निवडले. माझ्यावर पडलेल्या या वाढत्या जबाबदारीमुळे माझ्या मनावर बरेच दडपणही आले. परंतु माझे मार्गदर्शक पू.डॉ.यु.म. पठाण साहेब [ प्रमुख, मराठी विभाग, मराठवाडा विद्यापीठ ] यांनी मला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनामुळे व त्यांनी दिलेल्या उत्तेजनामुळे-धीरामुळे मी प्रबंध-लेखनाची ही कठीण जबाबदारी यशस्वी पेलू शकलो. या कार्यातील माझ्या यशाचे सर्व श्रेय मार्गदर्शकांचेच आहे ही नम्र जाणीव मला सतत राहील.

श्रीमती शैलजा खानोलकर यांनी खानोलकरांची पुस्तकरूपाने प्रसिद्ध न झालेल्या "खडक" या कादंबरीची कात्रणे त्वरित पाठवून सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

कै. खानोलकरांच्या जीवनचरित्राची माहिती मिळविण्यासाठी पत्रव्यवहाराने केलेल्या माझ्या प्रयत्नात ज्यांनी मला सहकार्य केले त्यांचाही मी ऋणी आहे. या संदर्भात कै. खानोलकरांचे परममित्र व कवी श्री आ.ना. पेडणेकर व नटवर्य श्री. माधव वाटवे यांच्या सहकार्याचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल.

"सत्यकथे"ने आपल्या काही अंकातून खानोलकरासंबंधी दुर्मिळ माहिती व लेख प्रसिद्ध केले. खानोलकरांच्या साहित्याच्या अभ्यास-कांची त्यांनी जी सोय करून ठेवली त्याबद्दल एक अभ्यासक या नात्याने मी "सत्यकथे"च्या संपादकांचा आभारी आहे. तसेच खानोलकरांच्या साहित्यावर ज्यांनी पुस्तके-लेख लिहिले त्यांचीही अप्रत्यक्षरीत्या मला मदतच झालेली आहे. त्यांचाही मी ऋणी आहे.

माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री प्र.रा. स्वामी यांनी मला जे सहकार्य केले, उत्तेजन दिले, त्याचे ऋण मी विसरू शकत नाही.

माझे परमस्नेही श्री. गोविंद पंडित मोरे यांनी मला सतत उत्तेजन दिले. सहकार्य केले या बद्दल मी ऋणी आहे.

माझे वडील बंधू श्री कपिलकुमार खाते व माझ्या पत्नी सौ. कला आणि माझी मुले यांनी मला पुरेसे मानसिक स्वास्थ्य देऊन उपकृत केले आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच मला माझा प्रबंध लवकर पूरा करता आला. त्याचाही मी ऋणी आहे.

श्री विजयकुमार कनकदंडे ( "प्रगती" टाइपरायटिंग इन्स्टिट्यूट, उदगीर ) यांनी सुबक टंकलेखन केले, या बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

उदगीर

कृष्णचंद्र भालचंद्र खाते

लेखक —